VTG/ KGS/ D/ KTG/ 13.00

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला.

--

**पृ.शी.मु.शी** : मुख्यमंत्र्यांचा परिचय

**सभापती** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री.पृथ्वीराज दाजीसाहेब चव्हाण यांचा मी सभागृहाला परिचय करुन देत आहे.

--

**पृ.शी.मु.शी**. : मंत्र्यांचा परिचय

**सभापती** : आता माननीय मुख्यमंत्री आपल्या मंत्रिमंडळातील सहकारी मंत्र्यांचा परिचय करुन देतील.

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. अजित अनंतराव पवार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.नारायण तातू राणे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.छगन चंद्रकांत भुजबळ यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.रावसाहेब रामराव पाटील ऊर्फ आर.आर.पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, डॉ.पतंगराव श्रीपतराव कदम यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

2..

12-01-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

सभापती महोदय, श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.जयंत राजाराम पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.हर्षवर्धन शहाजीराव पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.गणेश रामचंद्र नाईक यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.विजय उर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, प्रा.लक्ष्मण कोंडीबा ढोबळे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.अनिल वसंतराव देशमुख यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.जयदत्त सोनाजीराव क्षीरसागर यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.मनोहरराव राजूसिंग नाईक यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, डॉ.विजयकुमार कृष्णराव गावित यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.सुनील दत्तात्रय तटकरे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

सभापती महोदय, श्री.बबनराव भिकाजी पाचपुते यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.राजेश अंकुशराव टोपे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.राजेंद्र जवाहरलाल दर्डा यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.सुरेश हिरायेन्ना शेट्टी यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.हसन मियालाल मुश्रीफ यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

नंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/ 13:05

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

सभापती महोदय, डॉ. नितीन काशिनाथ राऊत यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. मधुकर देवराव चव्हाण यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. पद्माकर विजयसिंग वळवी यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, प्रा. (श्रीमती) वर्षा एकनाथ गायकवाड यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. संजय वामनराव देवतळे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. रणजित प्रतापराव कांबळे यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. भास्कर भाऊराव जाधव यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री.प्रकाश सुंदरराव सोळंके यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. सचिन मोहन अहिर यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, प्रा. (श्रीमती) फौजिया तहसीन खान यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. गुलाबराव बाबुराव देवकर यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय,श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

सभापती महोदय, श्री. राजेंद्र डी. गावित यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. डी. पी. सावंत यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

----

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधानपरिषद सभागृह नेत्यांबाबत घोषणा

**सभापती** : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभागृह नेत्याचे पद रिक्त असून महाराष्ट्र विधानपरिषद सभागृह नेत्याच्या नियुक्तीसंदर्भात मला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पत्र पाठवून कळविले आहे की, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 2 (जे-1) मधील तरतुदीनुसार विधानपरिषद सभागृहाचे नेते म्हणून श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांची नियुक्ती करीत आहे. त्याप्रमाणे मी श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांना विधानपरिषद "सभागृह नेता" म्हणून घोषित करीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी मंत्र्यांचा परिचय करुन दिला. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, या राज्याचा कारभार मराठी भाषेमध्ये होईल. परंतु याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय राज्यमंत्र्यांचा परिचय श्री.डी.पी. सावंत असा करुन दिला आहे. माननीय राज्यमंत्र्यांचे नाव त्यांच्या आई-वडिलांनी मराठीमध्ये ठेवले आहे. तेव्हा तशाप्रकारे मराठीमध्ये नाव उच्चारले असते तर बरे झाले असते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी

**सभापती** : प्रश्नोत्तरांच्या तासाला सुरुवात करण्यापूर्वी माझ्याकडे नियम 289 अन्वये एकूण तीन प्रस्ताव देण्यात आले आहेत. हे तिन्ही प्रस्ताव अत्यंत महत्वाचे आहेत. "महाराष्ट्रामध्ये विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रासह संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले आहे". या विषयासंदर्भात हे तिन्ही प्रस्ताव देण्यात आले आहेत. यामध्ये पहिला प्रस्ताव माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, रामदास कदम, विनोद तावडे, माननीय सदस्या डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, चंद्रकांत पाटील, किरण पावस्कर, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांचा प्रस्ताव माझ्याकडे सकाळी 8.50 मिनिटांनी देण्यात आला. त्याच पध्दतीने माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचा नियम 289 अन्वये दुसरा प्रस्ताव सकाळी 8.52 वाजता माझ्या कार्यालयामध्ये देण्यात आला. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सकाळी 8.55 वाजता त्यांचा तिसरा प्रस्ताव माझ्या कार्यालयामध्ये सादर केला. हे तिन्ही प्रस्ताव "अवकाळी पावसाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसान" या विषयाच्या अनुषंगाने देण्यात आले आहेत. तेव्हा या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/D/KTG पूर्वी श्री.सरफरे .... 13:10

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी आम्ही विधान परिषद नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे.मागील वर्ष हे सुध्दा दुष्काळाचेच गेले आणि यावर्षी देखील साधारणत: जून-जुलै महिन्यामध्ये बऱ्यापैकी पाऊस झाला. त्यावेळी राज्यातील शेतकऱ्यांना असे वाटले की, यावर्षी मागच्या वर्षीच्या दुष्काळाची पूर्ण भरपाई होईल आणि चांगले पीक येईल. परंतु प्रत्यक्षात या काळामध्ये सतत पाऊस सुरु राहिला आणि विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र अशा प्रकारे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी सरासरीपेक्षा दुप्पटीने तर काही ठिकाणी दीड पटीने पाऊस पडला. काही ठिकाणी एकेका दिवशी 66 मि.मि.पाऊस झाला आणि या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पीके नष्ट झाली. कोकणातील, ठाणे जिल्ह्यातील आणि विदर्भामध्ये गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा इ.जिल्ह्यातील भाताचे पीक नष्ट झाले. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, भाताची कापणी झाल्यावर धो-धो पाऊस सुरु झाला, त्यामुळे भाताचे पीक जागच्याजागी सडून गेले. विदर्भामध्ये दहा टक्के देखील कापसाचे पीक शिल्लक राहिले नाही. तसेच कापूस, सोयाबीन, ज्वारी ही पिके नष्ट झाली.शेतकऱ्यांच्या हातामध्ये कोणतेही पीक आले नाही. एका बाजूला शेतकरी अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झाला. दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांवर आलेले नैसर्गिक संकट आणि तिसऱ्या बाजूला मानवी संकट आले. माझ्याकडे महाराष्ट्राची पूर्ण आकडेवारी आहे. पण हा विदर्भ आत्महत्याग्रस्त झालेला आहे.या विदर्भातील जो शेतकरी गेल्या दोन-तीन महिन्यापूर्वी एक लाख क्विंटलच्यावर रब्बी पीक घेण्यासाठी तयार झाला होता. ज्या शेतकऱ्यांने शेती तयार केली होती, ज्याने आपल्या शेतामध्ये कांदा, गहू इ. विविध पीके लावली होती, अशा दीड लाखशेतकऱ्यांची विजेची कनेक्शन्स् तोडण्यात आली, म्हणजे एका बाजूला नैसर्गिक संकट आणि दुसऱ्या बाजूला सरकारचे संकट अशा स्थितीत कोणता तरी आदर्श घोटाळा पुढे आला आणि सरकारने शेतकऱ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. याबाबतीत माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी त्यांचा शपथविधी झाल्यानंतर एका पत्रकार परिषदेमध्ये सांगितले आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील याबाबत पंचनामे करण्याचे आदेश दिले. पण तोपर्यंत राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त झालेला होता. अजूनही राज्यामध्ये पंचनामे करण्याचे काम सुरु झालेले नाही. त्यामुळे हे सरकार राज्यातील शेतकऱ्यांच्याप्रती किती गंभीर आहे हे लक्षात येईल. राज्यातील शेतकरी हवालदिल झालेला असून त्याचा अपेक्षाभंग झालेला आहे.आता शेतकऱ्यांना या सरकारकडून कोणतीही अपेक्षा उरलेली नाही. अशा परिस्थितीत या प्रस्तावाच्या माध्यमातून आमची

. . . . सी-2

श्री.पांडुरंग फुंडकर .....

अशी मागणी आहे की, ज्या शेतकऱ्यांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झालेले आहे, त्या शेतकऱ्यांना प्रथम सरकारने ताबडतोब हेक्टरी 25 हजार रुपयांची मदत जाहीर करावी आणि ज्या फळबाग शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे, त्यांना हेक्टरी 50 हजार रुपयांची मदत जाहीर करावी. माझी तिसरी मागणी अशी आहे की, ज्या भागामध्ये अवकाळी पावसामुळे शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे,पिकाचे नुकसान झालेले आहे, अशा शेतकऱ्यांची या सरकारने विजेची कनेक्शन्स् तोडलेली आहेत आणि त्यामुळे तो संकटात सापडलेला आहे. अशा शेतकऱ्यांची विजेची कनेक्शन्स् ताबडतोब जोडण्याबाबत सरकारने आदेश द्यावेत. या तीनही मागण्यांच्या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांना विनंती करणार आहे की, तुम्ही याबाबतीत कधीतरी काही घोषणा करणार असाल. परंतु आज याबाबतीत काही धोरणात्मक घोषणा करावी. आज शेतकऱ्यांचे विजेचे कनेक्शन तोडणात आले आहे, त्यांना रब्बीच्या पिकासाठी धीर द्यावा आणि विजेची कनेक्शन जोडण्याच्या बाबतीत घोषणा करावी,असा आमचा आग्रह आहे.मग आम्ही याबाबत चर्चा करणार नाही.सरकारने या तीन घोषणा केल्यानंतर जर माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांची इच्छा असेल तर मग या विषयावरील चर्चेमधून अनेक पैलू पुढे येणार आहेत आणि मग आपल्याला त्याप्रमाणे पुढील निर्णयाची दिशा ठरविता येईल, असा आमचा आग्रह आहे. त्यामुळे आजचे सभागृहापुढील कामकाज बाजूला ठेऊन अगोदर या दोन-तीन प्रश्नांबाबत निर्णय द्यावा,अशी आमची आग्रहाची मागणी आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अतिशय गंभीर मुद्दा मांडलेला आहे.सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या अनुषंगाने आपापल्या मतदार संघामध्ये जाऊन माहिती गोळा केली आहे.जेव्हा मंत्रिमंडळाची पहिली बैठक झाली,त्यावेळी हा विषय उपस्थित करण्यात आला होता.मी आपल्याला आश्वासन देऊ इच्छितो की, शासनाची कोणत्याही विषयावर चर्चा करण्याची पूर्णपणे तयारी आहे.कारण हा अत्यंत गंभीर विषय आहे, त्यामुळे याबाबतीत चर्चा करुन आपल्याला पुढील निर्णयाप्रत येता येईल. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अतिशय गंभीरपणे विषय मांडलेला आहे.त्यामुळे आपल्याकडून ज्या दिवशी ज्या नियमाप्रमाणे चर्चा घेण्याचे ठरविण्यात येईल, त्यादिवशी त्या नियमांतर्गत सदरहू चर्चा घेण्याचे ठरविण्यात येईल, त्यावेळी शासनाची याविषयावर चर्चा करण्याची पूर्ण तयारी आहे.

(घोषणा)

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी याठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या अनुषंगाने चर्चा करण्याची शासनाची पूर्ण तयारी आहे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितलेले आहे.

( काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मांडताना या प्रस्तावातील विषयावर आम्ही चर्चा करणार नाही असे म्हटले आहे. तसेच या प्रस्तावाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाच्या अशा तीन गंभीर बाबी मांडल्या आहेत. या तीन गंभीर बाबींच्या संदर्भातील धोरण शासनाने जाहीर करावे, अशा पध्दतीची मागणी मी केलेली आहे.

**सभापती** : मला सभागृहाला एवढेच सांगावयाचे आहे की, ज्यावेळी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या माध्यमातून एखादी मागणी करण्यात येते त्यावेळी अत्यंत अपवादात्मक अशा परिस्थितीत सभागृहाचे प्रश्नोत्तराचे कामकाज थांबवून नियमाप्रमाणे जो प्रस्ताव दिलेला आहे त्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्यात यावी, असा त्या प्रस्तावाचा अर्थ असतो. या ठिकाणी नियम 289 अन्वये एकूण तीन प्रस्ताव देण्यात आलेले आहेत ते देण्यामागे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांची अशी अपेक्षा आहे की, आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात यावी. त्याबद्दलचा निर्णय मी अद्याप दिलेला नाही. आणखी एक-दोन सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मी या संदर्भातील निर्णय देईन.

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलता येते काय?

**सभापती** : आता पर्यंत ज्या ज्या वेळी नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी मांडला आणि त्याबाबतचे आपले मत या सभागृहात व्यक्त केले. त्यानंतर सत्तारुढ पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी तसेच सभागृहाच्या नेत्यांनी सुध्दा अनेकवेळा आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव आपल्याकडे दिलेला आहे. मला कल्पना आहे की, हा स्थगन प्रस्ताव आहे तसेच आपण यासंदर्भातील निर्णय अद्याप दिलेला नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KTG/

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहाच्या काही प्रथा, परंपरा आहेत. या सभागृहाचा डेकोरम सांभाळण्याचा आपण नेहमीच प्रयत्न करीत असतो.उदा. सभागृहाचे एखादे सन्माननीय सदस्य बोलत असताना इतर सन्माननीय सदस्यांनी त्यांना क्रॉस करु नये. खिशात हात घालून बोलू नये. सभागृहात टोपी घालावयाची नाही. घातली असेल तर ती काढावयाची नाही.सभापती महोदय, आपण अत्यंत जुने सदस्य आहात. आपल्याला या सभागृहाच्या सगळया प्रथा व परंपरा माहीत आहेत. या सभागृहात काही सन्माननीय सदस्य वेगळया प्रकारचे जॅकेट घालून बसलेले आहेत. अशा प्रकारे वेगवेगळया प्रकारचे जॅकेट घालण्या पाठीमागच्या त्यांच्या भावना बरोबर आहेत. सन्माननीय सदस्यांना या सभागृहात काही बोलावयाचे असेल, आपल्या भावना व्यक्त करावयाच्या असतील किंवा काही चर्चा करावयाची असेल तर ते जरुर चर्चा करु शकतात. पण अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांनी  वेगळया प्रकारचे जॅकेट घालून सभागृहात येणे हे या सभागृहाच्या प्रथा व परंपरेला धरुन नाही. सन्माननीय सदस्यांनी त्यांचे जॅकेट सभागृहाच्या बाहेर काढून ठेवले पाहिजे. अन्यथा सभापती महोदय, आपल्याला त्यांच्यावर कारवाई करावी लागेल किंवा त्यांना सभागृहाच्या बाहेर जावयास सांगावे लागेल त्या शिवाय या सभागृहाचे कामकाज कसे सुरु ठेवणार?

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे.विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेगळया प्रकारचे जॅकेट घालून सभागृहात बसलेले आहेत अशा प्रकारचा हरकतीचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. छगन भुजबळ यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. पण महात्मा गांधीनी काँग्रेसची ओळख त्यांच्या टोपीवरुन दिली होती. पण काँग्रेसचा एकही सदस्य आज टोपी घालत नाही. त्यामुळे ते महात्मा गांधीजींचा अवमान करतात.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आता आपण लोकांना टोप्या घालता. पूर्वी आमचे सन्माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी बसत होते तेव्हा त्यांच्या डोक्यावर काहीही नव्हते. आता त्यांच्या डोक्यावर केस आलेले आहेत. श्री. राजेश टोपे यांना आम्ही पूर्वी जसे पाहिले होते तसे ते आता दिसत नाहीत. ते आम्हाला अपरिचित वाटतात. त्यांनाही बाहेर काढा

**सभापती** : सभागृहात घातलेली टोपी काढता येणार नाही आणि काढलेली टोपी घालता येणार नाही. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्रिमहोदय श्री. छगन भुजबळ यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या अनुषंगाने संबंधित जे तीन सन्माननीय सदस्य आहेत त्यांनी नोंद घेणे जरुरीचे आहे. खरे तर सभागृहात या पध्दतीने जाकीट घालून येणे योग्य नाही. याबाबतीत सन्माननीय सदस्यांना यापेक्षा जास्त सांगणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी याची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हे अधिवेशन विदर्भामध्ये होत आहे. मला खात्री आहे की, विदर्भातील शेतकऱ्यांच्या बाबतीत आपण वेगळी चर्चा घेणार आहोत. अवकाळी पावसाचा विषय अचानक सभागृहामध्ये आलेला नाही. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री या दोघांनीही बाहेर विधाने केलेली आहेत की, आम्हाला याची जाणीव आहे आणि आम्ही शेतकऱ्यांना योग्य ती मदत देणार आहोत. याचा अर्थ त्यांनी याची तयारी केलेली आहे आणि त्यांना कल्पना आहे. मला सदनाचा अधिक वेळ घ्यावयाचा नाही. म्हणून माझी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, या ठिकाणी पाच तास चर्चा करण्यापेक्षा हा विषय आपल्याला माहीत आहे, आपण त्याचा अभ्यास केलेला आहे. जवळजवळ 10 लाख हेक्टर जमीन उद्ध्वस्त झालेली आहे. 2 लाख शेतकऱ्यांची कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत. म्हणून सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव ठेवला आहे त्याप्रमाणे शेतीला हेक्टरी किमान 25 हजार रुपये आणि फळबागेसाठी 50 हजार रुपये मदत जाहीर केली तर सभागृहाचा वेळ वाचेल. याबाबत चर्चा करण्याची आवश्यकता नाही. हे अधिवेशन चालू असताना पुढे विदर्भातील शेतकऱ्यांच्या बाबतीत चर्चा करणारच आहोत. या सदनाचा अधिक वेळ न घेता माझी आपल्यामार्फत

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ...
माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे. आपण वित्तमंत्री आहात. आपण अभ्यास करुन आलेला आहात. आपल्याला यासंदर्भात कल्पना आहे. त्यामुळे या सदनाचा अधिक वेळ घालविण्यापेक्षा आपण जाहीर करुन टाकले तर या सदनाचा वेळ वाचेल आणि आपल्याला पुढचे कामकाज घेता येईल. म्हणून माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये या ठिकाणी प्रस्ताव मांडलेला आहे आणि त्या अनुषंगाने त्यांनी अशी मागणी केलेली आहे की, अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात सभागृहाचे बाकीचे कामकाज बाजूला सारुन त्यांनी दिलेला प्रस्ताव मान्य करावा. आता त्यांचे असे म्हणणे आहे की, आम्हाला चर्चा नको तर शासनाने निर्णय जाहीर करावा. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या निवेदनात सांगितले की, या चर्चेला आम्ही तयार आहोत आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आमची तयारी आहे. परंतु यासंदर्भात आपलेही मार्गदर्शन आम्हाला आवश्यक आहे. राज्यातील जे विविध प्रतिनिधी आहेत त्यांचे मार्गदर्शन घेऊन शासनाला योग्य निर्णय करता यावा यासाठी चर्चा होणे आवश्यक आहे. नियम 289 अन्वये आपण प्रस्ताव दिलेला आहे आणि नियम 289 यासाठी आहे की, सभागृहाचे बाकीचे कामकाज बाजूला सारुन जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर चर्चा करावी. यामध्ये त्या प्रस्तावावर केवळ चर्चाच नसते तर मतदान सुध्दा असते. ही चर्चा द्यावयाची की नाही याबाबतीत माननीय सभापतींचा अधिकार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी मान्य केले आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव मांडण्यास परवानगी मागितलेली आहे त्याला माननीय मुख्यमंत्र्यांनी अनुमती दर्शविलेली असताना त्या प्रस्तावावर चर्चा होऊ द्या. त्यानंतर शासन आपले म्हणणे मांडील आणि निर्णय देईल.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे त्याबाबत आपण अजून निर्णय दिलेला नाही. मी आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते, आम्ही सभागृहात स्पष्टपणे सांगितले आहे. हे अधिवेशन विदर्भामध्ये होत आहे. त्याच्या पाठीमागची

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. रामदास कदम ...

पार्श्वभूमी स्पष्ट असते की, विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा. विदर्भातील शेतकऱ्यावर भविष्यामध्ये चर्चा होणारच आहे. अवकाळी पावसाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री या दोघांनीही बाहेर जाहीरपणे सांगितलेले आहे. आपण अभ्यास करुन आलेला आहात.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

म्हणून आम्ही दोघांनी बोलताना सांगितले आहे की, या प्रश्नावर चर्चा करण्यापेक्षा याठिकाणी माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांनी ठोस निर्णय जाहीर करावा. या सभागृहात विदर्भातील इतर प्रश्नांवर आम्ही चर्चा करणार आहोतच. माननीय सभापतींनी नियम 289 अन्वये वरील सूचनेबाबत अद्याप निर्णय दिलेला नाही, याची कल्पना माननीय मंत्री महोदय, श्री.नारायण राणे यांना नसावी.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी राज्यात अवकाळी पावसामुळे शेतक-यांचे अतोनात नुकसान झाल्याचे म्हटले आहे. त्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी, मी आणि इतर मंत्री महोदयांनी सभागृहाच्या बाहेर स्टेटमेंटस् केलेली आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये या विषयावर चर्चा सुरु करावी असे म्हटले आहे. माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांची देखील तशीच भूमिका आहे. या दोन्ही सन्माननीय मान्यवरांनी चर्चा करण्याऐवजी सरकारने ताबडतोब या संदर्भात घोषणा करावी अशाप्रकारचे वक्तव्य केलेले आहे. विधानसभा वा विधानपरिषद या दोन्ही सभागृहांच्या काही परंपरा आहेत. त्या परंपरेप्रमाणे सभागृहात उपस्थित झालेल्या विषयाबाबत चर्चा केली जाते. सरकारला जरी तो विषय माहीत असला तरी किंवा सरकार त्याबाबत बारकाईने विचार करीत असले तरी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी प्रथम आपापले मत मांडावे. सभागृहात झालेल्या चर्चेतून शेतक-यांना अधिक चांगल्या प्रकारे न्याय देता येईल. सभागृहात झालेल्या कोणत्याही चर्चेला उत्तर देण्याची किंवा ठामपणे निर्णय घेण्याची राज्य सरकारची भूमिका आहे. मग विदर्भातील शेतक-यांची विजेची कनेक्शन्स तोडल्याचा विषय असेल किंवा धानाचे नुकसान झालेले असेल, फळबागांचे नुकसान झालेले असेल या सर्व प्रश्नांबाबत चर्चेतून सूचना येऊ शकतात. सरकारने आज काही जाहीर केले आणि त्यातून एखादा विषय सुटून गेला तर त्या विषयाबाबत सरकारला आणखी काही चांगले सांगता आले असते असे वाटण्याची शक्यता आहे. म्हणून मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या प्रश्नासंबंधी चर्चा करण्याची या सभागृहाची व सरकारची तयारी आहे. या चर्चेला परवानगी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात. )





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, शेतक-यांना न्याय देण्याची सरकारची तयारी आहे. परंतु याठिकाणी राजकारण केले जात आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सरकारची चर्चा करण्याची तयारी आहे, परंतु घोषणा करण्याची तयारी दिसत नाही. हे योग्य नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना व इतर चारही सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण शिस्त पाळणारे सदस्य आहात याची मला कल्पना आहे. आपण आपल्या अंगावर जे डगले घातलेले आहे ते काढून टाकावे अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

( यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व इतर चारही सन्माननीय सदस्य अंगावरील डगले काढून ठेवतात. )

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी नियम 289 अन्वये चर्चा सुरु करावी अशी मागणी केलेली आहे. सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये मी नुकसानीचा पंचनामा करण्याची पध्दत ब्रिटिशकालीन असल्यामुळे ती बदलणे आवश्यक आहे असे म्हटले होते. याबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी ही पध्दत आपल्याला बदलावयाची आहे. या पुढील काळात सभागृहात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे पंचनामे होतील असे आश्वासन दिले होते. त्यावेळी आसनस्थ असताना आपणही माझ्या मागणीचे समर्थन केले होते. परंतु बदलेल्या पध्दतीप्रमाणे शासनाकडून भाताच्या नुकसानीचे पंचनामे अजूनपर्यंत झालेले नाहीत. अनेक ठिकाणी भाताचे पीक भिजलेले आहे. त्या पिकाची आधारभूत किंमतीने शासनाकडून खरेदी केली गेली पाहिजे. त्यादृष्टीकोनातून राज्य सरकारने मार्केटिंग फेडरेशनला किंवा इतर सक्षम यंत्रणेला कोणत्याही सूचना दिलेल्या नाहीत. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या वक्तव्याची मी पुनरावृत्ती करणार नाही.

यानंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:30

श्री. जयंत प्र. पाटील....

राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी राज्यातील परिस्थितीचा जो अभ्यास केलेला आहे त्या आधारे राज्य शासनाने शेतक-यांना मदतीचा हात देण्याची घोषणा केली पाहिजे. त्या घोषणेने आमचे समाधान झाले तर चर्चा करण्याची गरज राहाणार नाही. राज्य शासनाने केलेल्या घोषणेमध्ये काही अपुरेपणा वाटला तर या प्रश्नासंबंधी आम्ही निश्चितच चर्चा करु. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मागील 8-10 दिवसात राज्यातील विविध प्रश्नांचा अभ्यास केलेला आहे असे वाटते. या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि माझ्या अन्य सहका-यांनी अशी मागणी केलेली आहे की, आज राज्यामध्ये अवकाळी पावसामुळे जी काही परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि तिचा राज्य शासनाने जो काही अभ्यास केलेला आहे त्यानुषंगाने राज्य शासन शेतक-यांना कोणती मदत करणार आहे ते माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर करावे. ते जाहीर केल्यानंतर आमचे समाधान झाले तर चर्चा करण्याची आवश्यकता राहाणार नाही आणि सभागृहाचा वेळ वाचेल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन मोठमोठ्याने घोषणा देत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडताना अवकाळी पावसामुळे राज्यात निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत चर्चा करण्याची मागणी केलेली आहे. या विषयावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना चर्चा करावयाची आहे. सभापती महोदय, राज्याच्या वेगवेगळया भागामध्ये वेगवेगळी परिस्थिती आणि वेगवेगळे प्रश्न असू शकतात. शेतीच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे किंवा अन्य जे काही प्रश्न असतील त्यानुषंगाने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भावना व्यक्त करणे आणि त्यानंतर त्या आधारे शासनाने मदत जाहीर करणे हे अभिप्रेत आहे आणि सभागृहाला देखील हेच अपेक्षित आहे. सभापती महोदय, आपण एखादा प्रस्ताव मांडण्यास संमती दिली तर त्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करण्याचा अधिकार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

असतो आणि त्या अधिकारापासून सन्माननीय सदस्यांना आपण वंचित करु नये अशी माझी मागणी आहे. तेव्हा या संदर्भात निर्णय व्हायला पाहिजे.

**सभापती** : नियम 289 अन्वये तीन सूचना आलेल्या आहेत. अवेळी पावसाच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाच्या अशा या सूचना आहेत. त्यामध्ये आजचे सदनासमोरील प्रश्नोत्तराच्या तासासहीत सर्व कामकाज बाजूला सारुन महाराष्ट्रामध्ये अवेळी पावसामुळे जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, जी नैसर्गिक आपत्ती ओढवलेली आहे त्यासंदर्भात एक विशेष बाब म्हणून चर्चेला सुरुवात करावी, अशी मागणी केलेली आहे. त्यासंदर्भात मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे विचार ऐकले. त्याचप्रमाणे माझ्या अन्य सहकारी सन्माननीय सदस्यांचेही विचार ऐकले. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले विचार मांडल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांना बोलण्याची मी संधी दिली. तसेच अन्य सन्माननीय सदस्यांना देखील मी बोलण्याची संधी दिली. यासंदर्भात मी असा निर्णय देतो की, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याची जी सूचना दिलेली आहे त्यानुषंगाने आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये अवेळी पावसाच्या अनुषंगाने कोणतेही कामकाज नाही.

.....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 13:35

**सभापती**...............

तरीही अपवाद म्हणून, नैसर्गिक आपत्ती निर्माण झाली म्हणून मी आजच्या कामकाजातील प्रश्नोत्तराचा तास तहकूब करीत आहे. आजचे जे उर्वरित कामकाज आहे ते देखील मी तहकूब करण्याचे ठरविले आहे. यानंतर नियम 289 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या आहेत त्या अनुषंगाने मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावावरील चर्चा सन्माननीय विरोधी पक्षनेते सुरु करतील. दरम्यान सभागृहाच्या अनुमतीने तालिका सभापतींची नावे घोषित करुन मी सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत तहकूब करणार आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती** : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

(1) श्री.मोहन जोशी

(2) श्री.रमेश शेंडगे

(3) श्री.गोपीकिसन बाजोरिया

(4) श्री.केशवराव मानकर

सभागृहाची बैठक मी दुपारी 2.00 वाजेपर्यंत तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.36 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------

(नंतर आय.1...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर )

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**शोक प्रस्तावाबाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मघाशी आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यासंबंधीची घोषणा करीत असताना सांगितले होते की, आजच्या कामकाज पत्रिकेवरील संपूर्ण कामकाज बाजूला ठेवून राज्यात झालेल्या अवकाळी पावसाने जे नुकसान झाले त्या नुकसानीची भरपाई देण्यासंदर्भातील नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल. परंतु मधल्या काळात आपल्या सभागृहाचे विद्यमान सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांचे देहावसान झालेले आहे. त्यांना व इतर दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी आजच्याच कामकाज पत्रिकेवरील क्र. 4 वर शोक प्रस्ताव दिलेला आहे. आपल्या सभागृहाची अशी परंपरा आहे की, शोक प्रस्ताव सभागृहात संमत करताना सभागृहासमोर कितीही महत्वाचे कामकाज असले तरी आपण ते बाजूला ठेवून पहिल्यांदा असा शोक प्रस्ताव संमत करतो. अशा प्रकारे शोक प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतरच बाकीच्या कामकाजाला सुरुवात होत असते. म्हणून माझी अशी विनंती आहे की, आपण मघाशी सभागृहात जरी जाहीर केलेले असले तरी सभागृहात शोक प्रस्तावावर प्राधान्याने चर्चा घ्यावी व नंतरच उर्वरित कामकाज घ्यावे.

**सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवरील क्रमवारीमध्ये शोक प्रस्ताव हा विषय क्र. 4 वर आहे ही वस्तुस्थिती आहे. माझ्याकडून मघाशी अनवधानाने हा विषय राहून गेला व त्यासाठी मी सभागृहाची दिलगिरी व्यक्त करतो आणि आजच्या कामकाजात दाखविलेल्या शोक प्रस्तावावरील चर्चा प्रथम घेण्यात येईल, नंतर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माईक सिस्टीम बरोबर काम करीत नसल्यामुळे आता आपण जो काही निर्णय दिलेला आहे, तो आम्हाला ऐकू आलेला नाही.

**सभापती** : कामकाजासंदर्भात मी मघाशी असा निर्णय दिला होता की, आज केवळ नियम 289 अन्वेयच्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल व या चर्चेमुळे आजच्या कामकाजातील प्रश्नोत्तराचा तास आणि अन्य कामकाज थांबवण्यात येईल. खरे तर शोक प्रस्ताव झाल्यानंतर, नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्यात येईल, हे वाक्य माझ्याकडून अनावधानाने राहून गेले, त्याबद्दल मी सभागृहाची दिलगिरी देखील व्यक्त केलेली आहे. नियम 289 च्या प्रस्तावाला सुरुवात करण्यापूर्वी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शोक प्रस्तावासंदर्भात सभागृहाला आठवण करुन दिल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

श्री सय्यद जमा ( महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित ) : माननीय सभापति जी, जो शोक प्रस्ताव यहां पर रखा गया है, उस शोक प्रस्ताव में महाराष्ट्र के दो प्रमुख स्वर्गीय व्यक्तियों के नाम छूट गए हैं. स्वर्गीय कवि श्री नारायण सुर्वे जी तथा स्वर्गीय श्री विठ्ठल उमप जी का नाम इस शोक प्रस्ताव में नहीं है. इन दोनों माननीय स्वर्गीय व्यक्यिों के नाम इस शोक प्रस्ताव में शामिल करने संबंधी एक पत्र माननीय सदस्य श्री जयप्रकाश छाजेड जी ने आपको दिया है. श्री छाजेड जी की विनती मान्य की जाये, ऐसा मेरा आपसे अनुरोध है.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. हुसेन दलवाई व जयप्रकाश छाजेड यांनी या विषयासंदर्भातील सूचना माझ्याकडे येऊन केली होती. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात मी असा निर्णय देतो की, "दि. 9 डिसेंबर, 2010 रोजी कामकाज सल्लागार समितीची बैठक असून त्या बैठकीमध्ये हा विषय ठेवण्यात येईल व कामकाज सल्लागार समितीच्या पूर्व परवानगीने याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल." आता माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी शोक प्रस्ताव मांडावा, अशी मी त्यांना विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : शोक प्रस्ताव

**मु.शी.**: श्रीमती यशोधरा भगीरथजी बजाज, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री डॉ. वसंतराव निवृत्तीराव पवार , वि.प.स., नागोराव बाळकृष्ण सपाटे, रतनलाल चुनीलाल तापडीया, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, श्रीमती यशोधरा भगीरथजी बजाज, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री डॉ. वसंतराव निवृत्तीराव पवार, वि.प.स., नागोराव बाळकृष्ण सपाटे, रतनलाल चुनीलाल तापडीया, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्रीमती यशोधरा भगीरथजी बजाज, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री डॉ. वसंतराव निवृत्तीराव पवार , वि.प.स., नागोराव बाळकृष्ण सपाटे, रतनलाल चुनीलाल तापडीया, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सभापती महोदय, कै. यशोधरा भगीरथजी बजाज यांचा जन्म ऑक्टोबर 1930 मध्ये अमरावती जिल्ह्यात विष्णोरा येथे झाला. त्यांनी साहित्य रत्न पदवी प्राप्त केली होती.

कै. बजाज यांनी चंद्रपूर नगरपरिषदेच्या सदस्या, चंद्रपूर शहर काँग्रेसच्या अध्यक्षा व चंद्रपूर जिल्हा काँग्रेसच्या महिला फ्रंटच्या प्रमुख म्हणून कार्य केले. जिल्ह्यामधील महिला व बालकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. नागपूर विद्यापीठाच्या सिनेटच्या सदस्या, चंद्रपूर जिल्हा बालकल्याण प्रचार समितीच्या व चंद्रपूर जिल्हा सहकारी बोर्डाच्या चेअरमन, सर्वोदय मंडळाच्या संस्थापक-संघटक व चंद्रपूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालयाच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी कार्य केले. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन शासनाने त्यांना **"दलितमित्र"** पुरस्काराने सन्मानित केले होते.

कै. बजाज या 1990 ते 1996 या कालावधीत विधानपरिषदेच्या राज्यपालांद्वारे नामनियुक्त सदस्या होत्या. 1972 मध्ये सावली व 1980 मध्ये चिमूर मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवरही त्या निर्वाचित झाल्या होत्या. विधानसभेच्या आश्वासन समितीच्या त्या प्रमुख होत्या. फेब्रुवारी 1983 ते मार्च 1986 या काळात सार्वजनिक बांधकाम खात्याचे राज्यमंत्रीपद त्यांनी भूषवले आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ....

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे शुक्रवार दिनांक 20 ऑगस्ट 2010 रोजी दु:खद निधन झाले.

कै. डॉ. वसंतराव निवृत्तीराव पवार यांचा जन्म ४ एप्रिल १९४८ रोजी झाला. त्यांनी एम्.बी.बी.एस्., एम्.एस. व एफ.आय.सी.एस् या पदव्या संपादन केल्या होत्या.

कै. डॉ. पवार यांनी सेवादलामध्ये, युवक काँग्रेसमध्ये, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षामध्ये तसेच, राष्ट्रवादी पक्षाच्या स्थापनेपासून नाशिक शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तसेच प्रदेश सरचिटणीस म्हणून कार्य केले.

कै. डॉ. पवार यांनी नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस तसेच, नाशिक येथील मेडीकल, कृषी, फार्मसी, मॅनेजमेंट व कला महाविद्यालय या संस्थांचे संस्थापक, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या नाशिकमधील केंद्रांचे समन्वयक, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेचे सदस्य, निफाड सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष, नाशिक येथील गोदावरी अर्बन को. ऑप. बँक व इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष, ७८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, शुश्रुषा ग्रुपचे संस्थापक, कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे विश्वस्त, छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष, सोमेश्वर देवस्थानचे विश्वस्त, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या व पुणे विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून कार्य केले.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.......

कै. डॉ.वसंतराव पवार हे निष्णात सर्जन होते. सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून त्यांनी कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत 27 हजार शस्त्रक्रिया करुन राष्ट्रीय कार्यात भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या सामाजिक, वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मोठ्या योगदानाबद्दल त्यांना "डॉ.बी.सी.रॉय पुरस्कार" आणि "नाशिक भूषण" हे पुरस्कार प्राप्त झाले होते. साहित्य, कला, क्रीडा व संस्कृती या क्षेत्रातही त्यांना विशेष रुची होती. कुटुंबकल्याण, आरोग्य व शिक्षण या विषयांवर त्यांनी अनेक लेख व शोध निबंध लिहिले आहेत.

कै. डॉ.वसंतराव पवार सन 2004 व 2006 असे दोन वेळा नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून निर्वाचित झाले होते. महाराष्ट्र विधानपरिषदेचे ते विद्यमान सदस्य होते.

कै.डॉ.वसंतराव पवार सन 1991 मध्ये नाशिक मतदारसंघातून लोकसभेवरही निर्वाचित झ ाले होते. मी देखील 1991 मध्ये लोकसभेवर निर्वाचित झालो होतो. तेव्हा पासून त्यांचे आणि माझे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांनी लोकसभेत वेगवेगळ्या विषयांवर अत्यंत पोटतिडकीने विषय मांडले. तसेच नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले. एका अतिशय उमद्या आणि सर्वांना हवेहवेशा वाटणाऱ्या समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक 7 ऑक्टोबर 2010 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्र एका चांगल्या समाजसेवकाला मुकला आहे. तसेच आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची देखील मोठी हानी झालेली आहे.

कै. नागोराव बाळकृष्ण सपाटे यांचा जन्म 7 ऑगस्ट 1932 रोजी नागपूर जिल्ह्यात उमरेड येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., बी.टी. पर्यंत झाले होते.

कै. नागोराव सपाटे यांनी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे कार्यवाह व सरकार्यवाह, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे अध्यक्ष, नागपूर विभागीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे सदस्य, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचे सदस्य, सर्वोदय स्वाध्याय मंडळ उमरेडचे सदस्य,नागपूर विद्यापीठाच्या भूगोल अभ्यास मंडळाचे सदस्य, उमरेड ग्रामसंपर्क मंडळाचे अध्यक्ष व उमरेड तालुका नगरसेनेचे समादेशक म्हणून कार्य केले.

..2..



श्री.अजित पवार.........

कै. नागोराव सपाटे यांनी उमरेड येथील जीवन शिक्षण मंडळाचे संस्थापक सदस्य म्हणूनही मोठे शैक्षणिक कार्य केले आहे. सुसंस्कारित विद्यार्थी घडविण्यासाठी त्यांनी विविध मार्गानी परिश्रम घेतले. त्यांच्या अध्यापन क्षेत्रातील कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना "आदर्श शिक्षक" म्हणून राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानीत केले.

कै.नागोराव सपाटे 1968 मध्ये विदर्भ विभाग शिक्षक मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या आदर्श शिक्षकाचे व समाजसेवकाचे सोमवार, दिनांक 20 सप्टेंबर 2010 रोजी दु:खद निधन झाले.

----

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय,सभागृहाचे नेते माननीय श्री. अजित दादा पवार यांनी श्रीमती यशोधरा भगीरथजी बजाज माजी वि.प.स. व मंत्री तसेच सर्वश्री डॉ. वसंतराव निवृत्तीराव पवार,वि.प.स.,सर्वश्री नागोराव बाळकृष्ण सपाटे, रतनलाल चुनीलाल तापडीया माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे

सभापती महोदय,श्रीमती यशोधरा भगीरथजी बजाज या अमरावती जिल्हयातील होत्या त्यांचे लग्न झाल्यानंतर त्या चंद्रपूर जिल्हयात गेल्या आणि त्या ठिकाणी त्यांनी आपल्या सामाजिक कार्यास सुरुवात केली. त्या चंद्रपूर नगरपरिषदेच्या सदस्या होत्या. त्याचबरोबर शहर कॉंग्रेसच्या अध्यक्षा व चंद्रपूर जिल्हा कॉंग्रेसच्या महिला फ्रंटच्या प्रमुख म्हणून देखील त्यांनी काम केले होते. त्याच प्रमाणे श्रीमती यशोधरा बजाज 1990 ते 1996 या कालावधीत विधान परिषदेच्या राज्यपालांव्दारे नामानियुक्त सदस्या होत्या. ज्यावेळी 1980 साली त्या विधान सभेत निवडून आल्या होत्या त्यावेळी मीसुध्दा त्या सभागृहाचा सदस्य होतो तेव्हा त्यांचा आणि माझा परिचय झाला होता. श्रीमती यशोधरा बजाज या महिला कार्यकर्त्या होत्या. त्यामुळे त्यांनी आपल्या क्षेत्रात आणि मंत्री झाल्यानंतर विदर्भासाठी भरीव असे काम केले होते. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या राज्यमंत्री झाल्यानंतर विदर्भातील बॅकलॉग कसा दूर करता येईल यादृष्टीने त्या सतत प्रयत्नशील राहिल्या होत्या. अशा ज्येष्ठ समाज सेविकेचे शुक्रवार, दिनांक 20 ऑगस्ट 2010 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय,डॉ.वसंतराव पवार हे या सभागृहाचे विद्यमान सदस्य होते. डॉ.वसंतराव पवार यांचा आणि माझा परिचय 1991 साली झाला होता. त्यावेळी ते लोकसभेवर निवडून गेले होते आणि मी सुध्दा त्याच वेळी लोकसभेवर निवडून गेलो होतो. जवळजवळ पाच वर्षे त्यांनी आणि मी एकत्र काम केले होते .नाशिक जिल्हयातील मराठा विद्या प्रसारक मंडळाचे ते सरचिटणीस होते तसेच नाशिक जिल्हयातील असंख्य सामाजिक संस्थांशी त्यांचा संबंध होता. नाशिक जिल्हयातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील इतर अनेक महत्वाचे प्रश्न अत्यंत हिरिरीने त्यांनी लोकसभेत मांडले होते. डॉ. वसंतराव पवार यांची लोकसभेचे सदस्य म्हणून निवड झाली होती त्यानंतर दोन वेळा त्यांची विधानपरिषदेचे सदस्य म्हणूनही निवड झाली होती. ते अत्यंत दिलदार मनाचे होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे असतांना इतर पक्षाच्या कार्यकर्त्याशीसुध्दा तेवढयाच प्रेमाचे

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

संबंध ते सतत ठेवत होते. काही माणसे आपल्या कर्तृत्वाचा समाज मनावर इतका खोलवर ठसा उमटवितात की तो ठसा काळालासुध्दा पुसून टाकता येत नाही याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे मराठा विद्या प्रसारक मंडळ या अग्रगण्य संस्थेचे सरचिटणीस,माजी खासदार , विद्यमान आमदार, सहकार महर्षी डॉ.वसंतराव पवार यांचे देता येईल. डॉ वसंतराव पवार यांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली होती. ते एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते. समाज मनाची नस त्यांना माहीत होती. त्यांच्याजवळ भविष्याचा वेध घेण्याची दूरदृष्टी होती. कर्तव्य हीच पूजा हाच जणू त्यांच्या जीवनाचा मूलमंत्र होता. सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य वाखाणण्यासारखे होते. त्यांच्या अचानक दु:खद निधनामुळे मराठा विद्या प्रसारक मंडळाचा आधारवड कोसळला असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय,निफाड तालुक्यातील एका छोटया गावात 4 एप्रिल 1948 रोजी डॉ वसंतराव पवार यांचा जन्म झाला होता . ते अत्यंत कुशाग्र बुध्दिमत्तेचे होते. वैद्यक शास्त्रातील उच्च पदवी घेऊन त्यांनी नाशिक शहरात वैद्यकीय व्यवसायाला सुरुवात केली आणि अल्पावधीतच एक नामवंत सर्जन म्हणून त्यांनी नाव लौकिक मिळवला होता. त्यांच्या स्वभावाचे एक वैशिष्टय होते. ते जरी सर्जन असले तरी त्यांनी आपल्या जीवनात पैशाला कधीही महत्व दिले नाही.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

अडलेल्या, नडलेल्या अशा गोरगरीब रुग्णांच्या शस्त्रक्रियांच्या बाबतीत त्यांनी एक संकल्प केला होता की, रोज किमान दोन-तीन शस्त्रक्रिया मोफत केल्याशिवाय ते जेवण घेत नसत. अशाप्रकारचा संकल्प करुन जगणारे ते महान कर्मयोगी होते असे त्यांना म्हणता येईल. त्यांचा प्रचंड जनसंपर्क होता. त्यामुळे सन 1981 मध्ये मराठा विद्या प्रसारक संस्थेचे उपसभापती म्हणून ते निवडून आले. शिक्षण क्षेत्रातील अचूक जाण व चुणूक यामुळे सन 1984 साली त्यांच्याकडे सरचिटणीसपदाची जबाबदारी सोपविण्यात आली, व त्यांनी मराठा विद्या प्रसारक मंडळाचा कायापालट घडवून आणला. बहुजन समाजाच्या मुलांसाठी वैद्यकीय, इंजिनिअरींग, फार्मसी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमाची कवाडे खुली झाली पाहिजेत याकरिता त्यांनी शासन दरबारी आपले वजन वापरुन हे अभ्यासक्रम आपल्या संस्थेमध्ये सुरु केले. त्यांचा विद्यापीठाच्या कायद्याचा दांडगा अभ्यास होता, त्यांना राजकारणामध्ये रस होता. ते सन 1991 साली खासदार झाले. मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे लोकसभेमध्ये सुध्दा त्यांनी अनेक प्रश्नांना वाचा फोडून आपला ठसा उमटविला होता. डॉ. पवार यांनी शिक्षण, राजकारण व समाजकारण याबरोबरच सहकार क्षेत्रामध्ये उडी घेऊन आपले संघटन कौशल्य पणास लावले. त्यांनी गोदावरी सहकारी बँकेची स्थापना केली. त्याचबरोबर त्यांनी निफाड सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे संभाळली. या कारखान्याला ऊर्जितावस्था प्राप्त करुन देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. डॉ. पवार हे दिलदार होतेच त्याचबरोबर ते कनवाळू देखील होते. गोरगरिबांना वैद्यकीय खर्च परवडत नाही म्हणून त्यांनी उत्तर महाराष्ट्रामध्ये अत्यंत भव्य असे मराठा प्रसारक मंडळाचे रुग्णालय उभारले. त्या रुग्णालयामार्फत त्यांनी गोरगरीब लोकांना अनेक प्रकारच्या मोफत वैद्यकीय सेवा पुरविल्या. त्यांना आपल्या संस्थेसाठी याहूनही अधिक काम करावयाचे होते. परंतु त्यांची स्वप्ने प्रत्यक्षात साकारण्याअगोदर क्रूर नियतीने त्यांच्यावर घाला घातला. सभापती महोदय, दुर्दैवाची गोष्ट अशी की, ज्या डॉक्टरांनी जन्मभर रुग्णांची सेवा केली, ज्या डॉक्टरांनी जन्मभर रुग्णांना मोफत सेवा दिली, त्याच डॉक्टरांवर नियतीने क्रूर घाला कुठे घालावा? नियतीने त्यांच्यावर विमानतळावर क्रूरपणे घाला घातला व ते आपल्या घरीसुध्दा पोहोचू शकले नाहीत. असा एक महान कर्मयोगी या सभागृहाला गमवावा लागला आहे. सभापती महोदय, या सभागृहामधील त्यांचे काम अतिशय अभिमानास्पद असल्याचे आम्ही सतत पाहिलेले आहे. कुणाचाही व्देष न करता आपल्याला जे योग्य वाटेल ते या सभागृहामध्ये मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, कै. रतनलाल चुनीलाल तापडीया व कै.नागोराव बाळकृष्ण सपाटे हे दोन्ही सदस्य आपल्या सभागृहाचे सदस्य होते. सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांनी आपापल्या क्षेत्रामध्ये काम केले आहे. कै. सपाटे यांनी विदर्भामध्ये आणि कै. तापडीया यांनी मराठवाडयामध्ये आपल्या कर्तृत्वाची छाप पाडली होती. असे हे चारही सभासद आज आपल्यामध्ये नाहीत. सभागृहाच्या माननीय नेत्यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला समर्थन देऊन मी माझ्या सहवेदना व्यक्त करतो.

**सभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये शोकप्रस्तावाच्या अनुषंगाने असा निर्णय घेण्यात आला आहे की, सभागृहाच्या माननीय नेत्यांनी सभागृहामध्ये शोकप्रस्ताव मांडल्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते त्या शोकप्रस्तावाला अनुमोदन देतील. आणि त्यानंतर सभापती आपल्या भावना व्यक्त करतील. अशाप्रकारे निर्णय झाला असला तरी या सभागृहाचे विद्यमान सदस्य डॉ. वसंत पवार यांचे दुर्दैवाने आकस्मिक निधन झाले आहे. त्यामुळे मी याबाबत अपवाद करुन एक-दोन माननीय सदस्यांना या शोकप्रस्तावासंबंधी आपले विचार व्यक्त करण्यास परवानगी देत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सदनामध्ये जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्या संदर्भात मी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कै.डॉ.वसंतराव पवार हे खरे म्हणजे आजही आमच्याबरोबर येथे उपस्थित असावयास हवे होते.पण दुर्दैवाने आज ते आपल्यामध्ये उपस्थित नाहीत.त्यांचे या सभागृहातील कामकाज हाच त्यांचा आणि आमचा खरा परिचय आहे. ते नेहमी मोजक्याच विषयावर अचूक बोलावयाचे आणि त्यावेळी व्यवस्थित रितीने आपली टिप्पणी मांडावयाचे. ते आम्हाला कधीही भेटले तर हसावयाचे.परंतु कै.डॉ.वसंतराव पवार यांचे नाशिक मध्ये किती मोठे स्थान होते हे ज्यावेळी आम्ही त्यांच्या अंतयात्रेसाठी तेथे गेलो त्यावेळी लक्षात आले.मघाशी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरभाऊ यांनी उल्लेख केला की, एका कर्मयोग्याचा अस्त झाला आहे आणि ते बरोबर आहे. रात्री घरी येण्यास कितीही उशीर झाला तरी ते दुसऱ्या दिवशी पहाटे 5.00 वाजता आपल्या रुग्णालयामध्ये उपस्थित असावयाचे आणि कोणत्याही परिस्थितीत किमान तीन शस्त्रक्रिया केल्याशिवाय त्यांचा दिवस सुरु होत नसे.अशा या कर्मयोग्याच्या जीवनामध्ये एक अव्दितीय असे सेवाभावी वृत्तीचे जे योगदान होते,ते आपल्याला क्वचितच कुठे पहावयास मिळते,असे आमचे डॉ.वसंतराव पवार होते.जे सर्वांसाठी रुग्णसेवेची तपश्चर्या करणारे होते.पण त्यांना मात्र अशा ठिकाणी ह्दयविकाराचा झटका आला की ज्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची तातडीने रुग्णसेवा उपलब्ध होऊ शकली नाही आणि त्यांची प्राणज्योत मालविली. आम्ही नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या प्रांगणामध्ये गेलो,त्यावेळी लक्षात आले की, या महाराष्ट्रामध्ये अनेक शिक्षण संस्था काढणाऱ्यांना "शिक्षण सम्राट" म्हटले जाते. ते सम्राट असू शकतील,पण ज्ञानाची एवढी तपश्चर्या करुन ते किती वाढविले यापेक्षा त्यांनी कोणत्या प्रकारची पिढी निर्माण केली आहे हे त्या संस्थेच्या प्रांगणामध्ये गेल्यानंतर लक्षात येते. नाशिकमध्ये लोकांच्या मनात एक असा समज होता की, एकदा आपल्या मुलाला लहानपणी नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेमध्ये घातल्यानंतर तो कोणती ना कोणती तरी डिग्री घेऊनच बाहेर पडणार, एवढया तेथे विविध शिक्षणाच्या उपलब्धी निर्माण झाल्या होत्या. महत्वाची बाब म्हणजे ते व्यवसायिक नव्हते. सध्याच्या व्यवसायिक शिक्षण सम्राटांच्या या जगामध्ये विद्यादानाचे पवित्र काम व्यवसायिकपणे न करणारे आणि कोणत्याही प्रकारचे अभिमत विद्यापीठ वगैरे निर्माण न करता ...

. . . .एन-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आपले विद्यापीठ हे सर्व सामान्यांसाठी आहे आणि त्यातून मला काही मिळाले नाही तरी चालेल. पण ते जसे आहे तसेच कार्यरत रहावे या दृष्टीकोनातून त्यांनी काम केले होते आणि अशा या कर्मयोग्याचे स्थान मी पाहिले आहे. या राज्यामध्ये एखाद्या मंत्री महोदयाचे किंवा एखाद्या मोठया व्यक्तीचे निधन झाल्यानंतर त्यांच्याही नशिबी येणार नाही, इतका प्रचंड मोठा शोकसागर नाशिक येथे पहावयास मिळाला. त्यांचे अत्यंदर्शन घेण्यासाठी एवढी मोठी रांग लागली होती की ती दोन दिवस झाले तरी देखील कमी होत नव्हती. एवढे कै.डॉ.वसंतराव पवार त्यांनी सामान्य जनतेचे प्रचंड प्रेम मिळविले होते आणि ते फार मोठे कठीण काम आहे.

सभापती महोदय, माझा त्यांच्याशी दुसऱ्यांदा जो परिचय झाला, त्यावेळी ते दिल्ली येथील मेडिकल कौन्सिलच्या निवडणुकीसाठी उभे राहिले होते. संपूर्ण महाराष्ट्रासाठी ती एकच जागा होती आणि ते त्या निवडणुकीमध्ये निर्विवाद निवडून आले. त्या निवडणुकीच्या वेळेस पाठिंबा मिळावा म्हणून माझ्याकडे अनेक डॉक्टर्स्नी येऊन सांगितले की, साहेब, आपला पाठिंबा पाहिजे, काहीही करा.पण आम्ही त्यावेळी सांगितले की,या निवडणुकीसाठी डॉ.वसंतराव पवार देखील उभे आहेत, त्यामुळे तुम्ही जी मागणी करीत आहात, तो विषयच उपस्थित होऊ शकत नाही. मग त्या निवडणुकीमध्ये देखील ते निर्विवाद निवडून आले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.वसंतराव पवार यांचे दुःखद निधन झाले, परंतु त्यांचे तसे काही वय झाले होते असे काही म्हणता येणार नाही. पण अचानक असे काय झाले हे मला माहिती नाही. पण त्यांच्या शोकसभेमध्ये माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब यांनी त्यांचे जे वर्णन केले, ते फार वेगळे होते. त्यांच्या मनामध्ये डॉ.वसंतराव पवार यांच्या संबंधातील जो मनामध्ये भाव होता, तो मी त्या दिवशी ऐकला. त्यावेळी आदरणीय माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब असे म्हणाले की, एका कार्यक्रमाच्या वेळेस ते व्यासपीठावर बसले होते आणि तेव्हा त्यांच्या बाजूला डॉ.वसंतराव पवार बसले होते. तेव्हा त्यांना अस्वस्थ वाटू लागल्यानंतर डॉ.वसंतराव पवार यांनी लगेच सांगितले की,आता एक मिनिटामध्ये येथून जावयाचे,येथे थांबावयाचे नाही आणि त्यावेळी त्यांना तातडीने वैद्यकीय मदत मिळाली आणि त्यामुळे तेव्हा त्यांना जो मॅसिव्ह हार्टअ‍ॅटॅक येण्याची शक्यता होती तो आला नाही. त्यानंतर ते मुंबईला आले. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेबांचे म्हणणे होते की,डॉ.वसंतराव पवार यांनी त्या क्षणाला दक्षता घेतली..

. . . .एन-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

नसती तर मी कुठे असतो हे सांगता येत नाही. असा तो प्रसंग हृदयद्रावक होता आणि डॉ.वसंतराव पवार त्यांच्या दक्षतेमुळे आज महाराष्ट्रातील एक नेतृत्व दिल्लीतील सरकारमध्ये काम करीत आहे. आज याठिकाणी डॉ.वसंतराव पवार यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करीत असताना मला त्या गोष्टीची आठवण झाली आणि त्या डोळयासमोर आल्या, असे डॉ.वसंतराव पवार होते. खरे म्हणजे आम्हाला त्यांचा सहवास जास्त काळ लाभला असता तर ते चांगलेच होते.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

अशा या डॉ. वसंतरावांचा अनेक संस्थांशी संबंध होता. एक माणूस, एक व्यक्तिमत्व एवढा मोठा व्याप कसा काय सांभाळत होते याचे आश्चर्य वाटते. हा सर्व व्याप ते अतिशय कार्यक्षमतेने सांभाळत होते. नावापुरते कोणतेही पद भूषवित नव्हते. अशा प्रकारचा एक अनमोल हिरा महाराष्ट्रामध्ये सत्तारुढ पक्षात होऊन गेला. मला डॉ. वसंतराव पवार यांच्या त्या कार्याचा खूप मोठा अभिमान वाटतो आणि आपण आपल्या जीवनामध्ये तसे कार्य करु शकलो नाही याची उणीव देखील जाणवते. आपण नेहमी काही तरी कार्य करीत असतो. पण मार्गदर्शन करणारे काही दीपस्तंभ निर्माण होतात त्यामुळे डॉ. वसंतराव पवार यांचे जाणे हे मनाला लागणारे होते.

सभापती महोदय, त्याचबरोबर श्रीमती यशोधरा भगीरथजी बजाज, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री नागोराव बाळकृष्ण सपाटे, रतनलाल चुनीलाल तापडीया, माजी वि.प.स. यांचे दु:खद निधन झालेले आहे. मी माझ्या तीव्र वेदनामय भावना व्यक्त करतो आणि त्यांना आदरांजली वाहतो. माननीय सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या प्रस्तावाला सहमती दर्शवितो. धन्यवाद.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MMP/

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री. अजित पवार यांनी मांडलेल्या आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अनुमोदन दिलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी किंबहुना त्याबाबतीतील माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, डॉ. वसंत पवार हे माझ्या गावचे म्हणजे नाशिक या शहरातील होते. सन 1991 सालच्या लोकसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने त्यांनी खऱ्या अर्थाने राजकीय प्रवास सुरु केला. त्यांचा एकूण राजकीय प्रवास दोन दशकांचा आहे. पण त्या अगोदर ज्यावेळी ते वैद्यकीय पदवी घेऊन नाशिकमध्ये आले त्यावेळची त्यांच्या आजुबाजूची परिस्थिती किंवा ते ज्या कौटुंबिक परिस्थितीतून आलेले होते, त्याची त्यांना खूप चांगली मदत होईल अशी परिस्थिती नसताना सुध्दा अल्पावधीतच एक लोकांचा डॉक्टर, लोकांसाठी दिवसरात्र एक करणारा डॉक्टर ही प्रतिमा त्यांनी समाजात निर्माण केली. त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रात लक्ष घालून मराठा विद्याप्रसारक समाजाच्या संस्थेमध्ये कामकाज करायला सुरुवात केली. गेल्या पंचवीस-तीस वर्षातील मराठा विद्या प्रसारक संस्थेचा शिक्षण क्षेत्रातील जो प्रवास आणि प्रगती आहे, ज्या शिखरावर ही संस्था पोहचली आहे त्यामध्ये डॉ. वसंतराव पवार यांनी केलेले काम अत्यंत मोलाचे आहे. निष्ठापूर्वक, शिक्षण क्षेत्रातील पावित्र्य टिकवून या संस्थेची जी उभारणी झालेली आहे ती महाराष्ट्रात इतरत्र कुठल्याही विभागात झालेली आपल्याला सहसा दिसणार नाही. बहुरंगी, बहुआयामी व्यक्तीमत्व असलेले डॉ. वसंतराव पवार होते. साहित्य, कला, संस्कृती या बरोबरच समाजसेवा आणि सामाजिक भान असण्याच्या जाणीवेतून ते ज्या समाजामध्ये वावरत होते. ज्या समाजामधून घडलेले हे व्यक्तीमत्व 1991 साली राजकीय क्षेत्रात आले ते सुध्दा कोणाचा वशिला, कोणाचा सांगावा म्हणून नव्हे तर त्यांनी समाजामध्ये स्व:ताचे जे स्थान निर्माण केले त्या स्थानामुळे त्यांना राजकारणामध्ये आमंत्रण देऊन आणले गेले. अशा पध्दतीने राजकारणात आल्यानंतर मग लोकसभेत असेल, विधान परिषदेत असेल, पक्ष संघटनेच्या बांधणीच्या कामामध्ये असेल, 24 तासापैकी 20 तास ते काम करीत असत. हे काम करीत असताना सुध्दा मूळ वैद्यकीय सेवेची आपली नाळ त्यांनी कधीही तोडली नाही. त्यांचा दिवस साधारणपणे पहाटे चार ते साडेचार वाजता सुरु व्हायचा. त्यांचा पहिला राऊंड त्यांच्या नाशिकमधील हॉस्पिटलमध्ये असायचा. तीन किंवा चार शस्त्रक्रिया केल्याशिवाय ते पुढच्या

..3...

श्री. हेमंत टकले....

कामाला निघायचे नाहीत. त्यानंतर दिवसाचे 24 तास ते राबत होते. मला एकच खंत वाटते की, अशा प्रकारे सर्वस्व पणाला लावून काम करणाऱ्या कार्यकर्त्याने थोडीशी काळजी घ्यावयास पाहिजे होती. जे डॉ. वसंत पवार माननीय श्री. शरद पवार यांची काळजी घेण्याबद्दल सजग होते ते स्वत:च्या बाबतीत मात्र मृत्यूचा सामना करताना पराजीत झाले. अतिशय दुर्दैवाची ती गोष्ट होती. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या निमित्ताने देशभरच्या कामकाजात, पुणे विद्यापीठाच्या कामकाजात, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कामकाजात,

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

या सर्व ठिकाणी त्यांनी अतिशय चांगली कामगिरी केली आणि आता कोठे यापुढे डॉ. वसंत पवार यांचे नेतृत्व अधिक वेगळ्या प्रकारे समाजासमोर येईल असे वाटत असतानाच ते आपल्यातून निघून गेले. ते या सभागृहाचे सदस्य होते. या सभागृहातील त्यांचा सहभाग आणि त्यांचे विचार आपण नेहमी ऐकलेले आहेत.

सभापती महोदय, याचबरोबर श्रीमती यशोधरा भगीरथजी बजाज, श्री. नागोराव बाळकृष्ण सपाटे, रतनलाल चुनीलाल तापडीया या माजी विधान परिषद सदस्यांचेही निधन झाले आहे. या सगळ्यांच्या निधनाबद्दल मी अतिशय मनापासून शोक प्रकट करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : श्रीमती यशोधरा भगीरथजी बजाज, माजी वि. प. स. व मंत्री, डॉ. वसंतराव निवृत्तीराव पवार, वि. प. स., सर्वश्री नागोराव बाळकृष्ण सपाटे, श्री. रतनलाल चुनीलाल तापडीया, माजी वि. प. स. यांच्या दु:खद निधनाच्या बाबतीत सदनाचे नेते श्री. अजित पवार साहेब यांनी जो दुखवटयाचा प्रस्ताव मांडलेला आहे आणि ज्याला सदनाचे माननीय विरोधी पक्ष नेते यांनी पाठिंबा दिलेला आहे त्या प्रस्तावावर मी या ठिकाणी माझे विचार व्यक्त करीत आहे.

स्व. श्रीमती यशोधरा बजाज 1983 साली जेव्हा राज्यमंत्री झाल्या तेव्हा त्या मंत्रिमंडळामध्ये मला त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली. चंद्रपूर जिल्ह्यातील एक अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्व म्हणून त्यांनी जवळजवळ 25 वर्षे चंद्रपूर, गडचिरोली या भागामध्ये काम केले आणि हे काम करीत असताना श्रीमती बजाज 1990 ते 1996 या कालावधीमध्ये विधान परिषदेच्या सदस्या होत्या. 1972 मध्ये सावली आणि 1980 मध्ये चिमूर मतदारसंघातून त्या महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाल्या होत्या. 1983 ते 1986 या कालावधीमध्ये त्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री होत्या. अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे दिनांक 20 ऑगस्ट, 2010 रोजी दु:खद निधन झ ालेले आहे.

या सदनाचे विद्यमान सदस्य आणि महाराष्ट्राचे सुपुत्र स्व.डॉ. वसंतराव निवृत्तीराव पवार यांचा आणि माझा 30 वर्षे घनिष्ट संबंध होता. वैद्यकीय क्षेत्रातील एक अत्यंत निष्णात शल्य चिकित्सक म्हणून ते संपूर्ण महाराष्ट्राला परिचित होते. नाशिक जिल्ह्यातील किंवा उत्तर महाराष्ट्रातील शैक्षणिक कार्याचा जो आलेख आहे तो डोळ्यासमोर घातला तर नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस तसेच नाशिक येथील मेडीकल, कृषी, फार्मसी, मॅनेजमेंट व कला महाविद्यालय या संस्थांचे संस्थापक, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या नाशिकमधील केंद्राचे समन्वयक अशा विविध क्षेत्रात आणि विशेषत: शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांनी जवळजवळ 20 वर्षे काम केलेले आहे. 1991 मध्ये ते नाशिक मतदारसंघातून लोकसभेवर निर्वाचित झाले होते तसेच 2004 आणि 2006 असे दोन वेळ ते या सदनाचे सदस्य म्हणून निर्वाचित झाले होते. या सदनामध्ये अनेक वेळा विशेषत: जे सामाजिक

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

प्रश्न आहेत त्या प्रश्नांच्या अनुषंगाने पोटतिडिकीने बोलणारे आणि त्या प्रश्नांचा पाठपुरावा करणारे आगळेवेगळे व्यक्तिमत्व या दृष्टीने आपण सगळे त्यांच्याकडे पाहात होतो. ते स्वत: निष्णात वैद्यकीय तज्ज्ञ असताना दुर्दैवाने दिनांक 7 ऑक्टोबर, 2010 रोजी त्यांचे हृदयविकाराने निधन झाले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

स्व.नागोराव बाळकृष्ण सपाटे यांचा जन्म दिनांक 7 ऑगस्ट, 1932 रोजी नागपूर जिल्हयात उमरेड येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.,बी.टी.पर्यंत झाले होते. स्व.सपाटे यांच्या अध्यापन क्षेत्रातील कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना 'आदर्श शिक्षक' म्हणून राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित केले होते. स्व. सपाटे 1968 मध्ये विदर्भ विभाग शिक्षक मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. अशा या आदर्श शिक्षकाचे व समाजसेवकाचे सोमवार, दिनांक 20 सप्टेंबर, 2010 रोजी दु:खद निधन झाले.

स्व.रतनलाल चुनीलाल तापडीया यांचा जन्म दिनांक 25 सप्टेंबर, 1940 रोजी परभणी जिल्हयातील गंगाखेड येथे झाला. त्यांचे शिक्षण वाणिज्य पदविकेपर्यंत झाले होते. स्व.तापडीया 1987 मध्ये परभणी स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शुक्रवार, दिनांक 1 ऑक्टोबर, 2010 रोजी दु:खद निधन झाले.

या सदनाचे नेते व माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी स्व.यशोधरा बजाज, स्व.डॉ.वसंतराव पवार, स्व.नागोराव सपाटे यांच्या दु:खद निधनाबद्दल दुखवटयाचा प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी माझ्या भावना व शोकही व्यक्त केलेला आहे.

सन्माननीय सभासदांनी एक मिनिट उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात. )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

आता मी सदनाचे कामकाज दुपारी 3 वाजेपर्यंत तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.42 ते 3.00 पर्यंत स्थगित झाली. )

-----

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

: **कागदपत्रे सभागृहासमोर ठेवण्याबाबत**

श्री. अजित पवार : उपसभापती महोदय, आज जेव्हा विधानपरिषदेच्या कामकाजाला सुरुवात झाली त्यावेळी सुरुवातीलाच सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 अन्वये मुद्दा उपस्थित केला. त्यावर सभागृहापुढील सर्व कामकाज स्थगित ठेवून चर्चा करण्यात येईल असा माननीय सभापती महोदयांनी निर्णय दिला. कामकाजपत्रिकेवरील बाब क्रमांक 4 वर दाखविण्यात आलेले "शोक प्रस्ताव" हे कामकाज देखील स्थगित ठेवण्यात आलेले होते. परंतु ते कामकाज घेण्यासंबंधी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विनंती केल्यानंतर सर्वांच्या संमतीने ते कामकाज घेण्यात आले. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जशी विनंती केली त्याप्रमाणे आजच्या कामकाजपत्रिकेवरील बाब क्रमांक "पाच"मध्ये दाखविलेले "अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे", बाब क्रमांक "सहा"मध्ये दाखविलेले "सन 2010-2011च्या पुरवणी मागण्या सादर करणे" आणि बाब क्रमांक "सात"मध्ये दाखविलेले "दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करणे" हे कामकाज आपण सभागृहाच्या संमतीने घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : उपसभापती महोदय, मी मघाशी केलेली सूचना ही एका विशिष्ट कामकाजाच्या संदर्भात होती. या सभागृहाचे विद्यमान सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार आणि अन्य माजी सन्माननीय सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्तावाचा विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेला आहे. कामकाजपत्रिकेवर शोक प्रस्तावाचा विषय आल्यानंतर ते कामकाज स्थगित व्हावे ही या सभागृहाच्या परंपरेला शोभणारी बाब नाही. या सभागृहामध्ये कितीही महत्वाचे विषय आले तरी शोक प्रस्तावासंबंधीचे कामकाज स्थगित झालेले नाही. तेव्हा खास बाब म्हणून शोक प्रस्तावासंबंधीचे कामकाज घ्यावे अशी मी माननीय सभापतींना विनंती केली.

...नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर........

सभापती महोदय, कामकामपत्रिकेवरील कामकाज स्थगित झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या दृष्टीने गंभीर असलेला विषय बाजूला सारुन सभागृहाचे इतर कोणतेही कामकाज विचारात घेणे संयुक्तिक होणार नाही. कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर उद्या ठेवता येऊ शकतील. परंतु शेतकऱ्यांवर ओढवलेला नैसर्गिक आपत्तीचा विषय अत्यंत गंभीर असून आम्ही मागणी केल्याप्रमाणे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी तीन महत्वाच्या घोषणा सभागृहात कराव्यात अशी आमची अपेक्षा आहे. शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये आर्थिक मदत दिली जावी, फळबागांसाठी 50 हजार रुपये प्रती हेक्टरी आर्थिक मदत दिली जावी आणि जे वीज कनेक्शन खंडित करण्यात आले आहेत ते पुन्हा जोडण्यात यावेत व पुढील वर्षभर वीज कनेक्शन खंडित केले जाणार नाहीत अशा प्रकारचे आश्वासन माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहाला दिले तर या प्रस्तावावर चर्चा करण्याची सभागृहाला गरज भासणार नाही.

सभापती महोदय, आपण व्यासपीठावरुन कामकाज स्थगित केल्याचे जाहीर केले आहे त्यामुळे आता त्या भूमिकेपासून मागे जाऊ नये अशी माझी विनंती आहे.

श्री.अजित पवार : प्रस्तावावरील चर्चा सुरु करण्यात यावी. चर्चेला उत्तर देण्याची राज्य सरकारची तयारी आहे.

श्री.दिवाकर रावते : माननीय उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा करावी.

श्री.अजित पवार : सभागृहामध्ये चर्चा केल्यानंतर त्या अनुषंगाने काय मदत करायची, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झाले आहे त्यांना काय आर्थिक मदत द्यायची त्याबाबत निश्चित ठोस भूमिका घेतली जाईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

**उपसभापती** : आता कामकाजपत्रिकेवरील बाब क्रमांक-पाच घेण्यात येत आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 9 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, 2010 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 10 - महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) अध्यादेश, 2010 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 13 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, 2010 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 15 - मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अध्यादेश, 2010 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन सभागृहात घोषणा देत असतात)

डॉ.विजयकुमार गावीत (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 14- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, 2010 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.सुनील तटकरे (जलसंपदा {कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून}मंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 11- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, 2010 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.राजेंद्र गावीत (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चा अध्यादेश क्रमांक 12- बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) अध्यादेश, 2010 मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन सभागृहात घोषणा देत असतात)

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन सभागृहात घोषणा देत असतात)

**पृ.शी./मु.शी.**: सन 2010-2011 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

श्री.अजित पवार (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010- 2011 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203(3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**उपसभापती** : सन 2010-2011 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

सभागृहाचे उर्वरित कामकाज स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 2 डिसेंबर, 2010 रोजीच्या दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 03 वाजून 10 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 2 डिसेंबर, 2010 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही